12:30:19 PM

नि.दि. दावा क्र.६५/२००९
अब्दुल सामद वि. अब्दुल वाहेद
निशाणी क्र. ७४ लगत

**प्रतिवादीचा साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. पी.के. निकम यांच्यामार्फत–**

१७. हे म्हणणे खरे नाही की, जिल्हा अधिकारी कार्यालयात दाखल केलेले अपील मी मागे घेतले. साक्षीदाराला उलटतपासामध्ये सही शिक्याची संचिकेची प्रत दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर तडजोड आणि त्या अनुशंगाने असणारा अर्ज जिल्हा अधिकारी यांच्या समक्ष अपील क्रमांक ०६/२००० मध्ये दाखल केला होता. आता मला दाखविण्यात आलेल्या अपील मेमोवर असणारी सही माझी नाही. सदर संचिकेत असणा–या वकालतनाम्यावरील सही माझी आहे. विधिज्ञ अहेतेशामुद्दीन यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपील मी दाखल केले. मी सही केलेले वकीलपत्र त्या वकीलांकडे असणा–या दोन–तीन प्रकरणांसाठी दिले होते. सदर वकील विधिज्ञ नेहरी यांचे असिस्टंट होते (सदर संचिका सार्वजनिक दस्ताऐवज असल्यामुळे त्यातील दस्तांना अनुक्रमे **निशाणी क्र. १५६ ते १६१** देण्यात आले). हे म्हणणे खरे नाही की, जिल्हा अधिकारी यांच्या समोरील अपीलात आमच्यात तडजोड झाली आणि त्याप्रमाणे प्रकरण निकाली झाले.

१८. विधिज्ञ नेहरी साहेब यांच्याकडे १७१ नंबरचे अपील होते. ते अपील वादी यांनी कन्नड न्यायालयाच्या निकालाविरुध्द केले होते. सदर अपील कन्नड न्यायालयाच्या नि.दि.दा. क्र.६२/१९९६ मधील माझ्या बाजुने झालेल्या निकालाबाबत केलेले होते. १७१ चे अपील काढुन टाकण्यात आले होते. वादी यांनी सदर अपील बीनशर्थ मागे घेतले होते. मी त्याबाबतचे कागद हजर केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी बीनशर्थ अपील मागे घेतले असे माझे म्हणणे खोटे आहे.

१९. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या मध्ये नोंदनिकृत वाटणी पत्र

झाले आणि त्याच्या आधारे अपीलात तडजोड होऊन ते निकाली झाले. (साक्षीदाराला त्याच्या उलटतपासातील परिच्छेद क्र.१६ मध्ये त्याने केलेल्या कथनाला अनुसरुन जिल्हा न्यायालयात कार्यवाही केली होती. याबाबत प्रश्न विचारण्यात आला.)

प्रश्न : तुम्हाला त्या प्रकरणाचा नंबर सांगता येईल का ?

उत्तर : १७१/२०००.

प्रश्न : वाटणीपत्र रद्द झालेले आहे का ?

उत्तर : वाटणीपत्र झालेलेच नाही.

२०. माझ्या म्हणण्याप्रमाणे जी कार्यवाही झाली त्यामध्ये चार–पाच आदेश झाले.

प्रश्न : वाटणीपत्रबाबत काय आदेश झाले ?

उत्तर : वाटणीपत्र झालेच नव्हते त्यामुळे काही आदेश होण्याचा प्रश्न नाही.

प्रश्न : दिनांक १७/०८/२०२३ रोजी बयान झाले ते खोटे आहे काय ?

उत्तर : ते बयान चुकीचे आहेत.

२१. हे म्हणणे खरे नाही की, मी परमेश्वराची शपथ घेऊन दिनांक १७/०८/२०२३ रोजी जाणुनबुजुन खोटी साक्ष दिली.

२२. कन्नड येथील गट नं. १०८ म्हणजे वादजमीन माझ्या मालकीची आहे हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कागद आहे. त्याबाबतचे कागद म्हणजे सातबारा उतारे आणि आजोबांचे रेकॉर्ड आहेत.

प्रश्न : तुमची मालकी दर्शविणारे काय कागदपत्रे तुमच्याकडे आहे ?

उत्तर : ६२/९६ मधील निकाल.

२३. माझे असे म्हणणे नाही की, त्या निकालाने मी एकटा मालक झालो. आम्ही आर्धे आर्धे (निम्मेनिम्मे)मालक झालो. हे म्हणणे खरे आहे की, माझा पुर्ण जमीनीवर ताबा नव्हता. दिनांक ०८/०२/१९९० च्या सातबा–यात वहितीमध्ये मालकी हक्काची नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमुद केल्याप्रमाणे १९९३ नंतर वाद असल्यामुळे दावा मिळकतीची

नोंद कोणाच्याही नावे नव्हती असे माझे म्हणणे खोटे आहे. १९९३ नंतर जो वाद झाला त्याबाबत तहसील, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा अधिकारी यांच्याकडे कोणतीही कार्यवाही चालु नव्हती.

२४. माझ्या सरतपासात नमुद केल्या प्रमाणे अपील क्र. १७१/२००० मध्ये माझ्याकडुन निकाल लागला असे दाखविणारा कागद अभिलेखावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपीलात माझी आणि वादी यांची तडजोड झाली होती. माझ्या सरतपासात नमुद केल्याप्रमाणे वादी यांनी महसुल अधिकारी यांच्याशी हात मिळवणी केल्याचा जो उल्लेख आहे त्या महसुल अधिकारी यांचे नाव आता मला आठवत नाही. वादी यांनी महसुल अधिकारी यांच्याशी हात मिळवणी करुन त्यांचे नाव लावुन घेतले अशी गोष्ट मला १९९९ ते २००० दरम्यान कळाले. मला हे आठवत नाही त्याबाबत मी वादी आणि महसुल अधिकारी यांच्या विरुध्द काही कार्यवाही केली की कसे. साक्षीदार स्वत: सांगतो की, कोर्टात केस सुरु असल्याने मी लक्ष दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नोंदनीकृत वाटपपत्र असल्याने मी कार्यवाही केली नाही. मी दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये माझ्या म्हणणा–या/असणा–या तथाकथीत वाटणीपत्राबाबत कोणताही अर्ज केला नाही. दावा मिळकत पुर्णता माझ्या कब्जात आहे हे दाखविण्यासाठी मी सातबारा उतारा, अनुदाना संबंधातील कागदपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात परिच्छेद क्रमांक ५ मध्ये नमुद केलेले विधान खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.१०८ शी वादी यांचा काहीही संबंध नाही असे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. ६८६१ बेकायदेशीर असल्याबाबत माझ्या तोंडी शब्दाशिवाय कोणताही पुरावा नाही.

प्रश्न : दिनांक २१/०६/२००० रोजी जे वाटपपत्र झाले त्यामध्ये तुम्ही सय्यद इलाल यांना विक्री केलेल्या व्यवहार रद्द करण्याची जबाबदारी घेतली होती ?

उत्तर : वाटणीपत्र झालेले नाही.

२५. दिनांक २१/०६/२००० रोजी मी कोठे होतो हे मला सांगता

येणार नाही.  हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१/०६/२००० रोजी नोंदणी क्रमांक ३०८४ ने अजुन एक वाटणीपत्र झाले होते.  हे म्हणणे खरे नाही की, ते वाटणीपत्र कुटुंबाच्या घर मिळकती बाबत झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या वाटणीपत्राने मिळकतींना आमचे नाव लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या वाटणीपत्राने अब्दुल समद यांना मिळकत आली आणि त्यांच्या वारसाने त्याची विक्री केली.  मी कन्नड न्यायालयात लतिफाबी यांच्या विरुध्द दाखल केलेला दावा प्लॉटच्या आर्धे जमीनीबाबत केलेला आहे.

**प्रतिवादी यांच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

समक्ष,  श्रवणोत्तर निवेदन

स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2024.07.18 13:57:45 +0530

कन्नड.

(वि. द. पाटील)

दिनांक : १८/०७/२०२४

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कन्नड.

01:49:31 PM